Epitome Journals
International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968 | Impact Factor = 0.565

भारतातील शेतकरी आत्महत्या : कारणे आणि उपाय

प्रा. संजय भालेराव
लोकप्रशासन विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, कन्नड
ता. कन्नड जि. औरंगाबाद

डॉ. प्रकाश खेत्री
समाजशास्त्र विभाग
डॉ. भिमराव आंबेडकर
कनिष्ठ महाविद्यालय, कन्नड
जि. औरंगाबाद

Abstract :

शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे. शेती हा भारताचा मुख्य व्यवसाय आहे. आजही 66 टक्के लोक शेती हा मुख्य व्यवसाय करतात. बिनाभरवश्याचा व्यवसाय म्हणजे शेती बनतो आहे. देशातील शेती आणि शेतकरी आज संकटात आहे. जगाच्या पोशिंद्याला स्वस्त धान्याच्या दुकानवर रांगेत उभा राहून 'अन्न सुरक्षा योजना' धान्य घ्यावे लागते. ही बाब अत्यंत गभीर, चिंता आणि चिंतन करायला लावणारी आहे. दर तासाला किमान दोन शेतकरी आत्महत्या करतात. या आत्महत्येची मुळे 1991 च्या नव आर्थिक धोरणात असल्याचे दिसून येते.

Keywords : *शेती, शेतकरी, आत्महत्या, कारण, उपाययोजना*

Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

Research Paper :

प्रस्तावना :

21 जून, 1991 रोजी पंतप्रधान म्हणून कॉग्रेसचे नेते नरसिंहराव आणि अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंह आरुढ झाले. या काळात देशापुढे आर्थिक संकट होते. चलनवाढीचा दर 17 टक्केतर आर्थिक वृद्धीचा दर केवळ 1.1 टक्क्यांनी घटला होता. परकीय चलनाच्या गंगाजळाची अवस्था केवळ आठवडाभर पुरेल इतकीच शिल्लक होती. परकीय कर्जाचे व्याज देणेही कठीण झाले होते. अशा आर्थिक आणीबाणीच्या काळात नव आर्थिक धोरणांचा स्विकार करणे देशा पुढील अपरिहार्यता होती. ते 1991 ला लागू झाले. या धोरणानूसार शेती आणि शेतकरी यांना दिली जाणारी सबसिडी टप्या–टप्याने कमी करण्यात आली. जागतिकीकरणामुळे अनेक कंपन्या भारतात आल्या, उदारीकरण आणि खाजगीकरणाच्या धोरणामुळे शेती आणि शेतक–यांच्या आथ्रिक विवचनेला सुरुवात झाली. शेतकरी दुर्बल, दुर्लक्षीत आणि दुबळा झाला. नैरश्याने ग्रासला गेला. म्हणून वैपफल्यग्रस्तेतून आत्महत्या करू लागला आहे. आज प्रश्न पडतो. कारण, भारत सरकारच्या गृहमंत्रालयाच्या नॅषनल क्राईम रेकॉर्डस ब्यूरोच्या अहवालानूसार 1996 ते 2005 या दहा वर्षात देशातील 1,66,204 शेतक–यांनी आत्महत्या केल्याचे नोंदविले आहे. तर राष्ट्रीय अपराध कार्यालयाच्या नोंदीनुसार 2008 मध्ये 17196 शेतक–यांनी आत्महत्या केल्या. सन 2009 मध्ये 17368 तर 1995 ते 2011 मध्ये 7,50,830 शेतक–यांनी आत्महत्या केलयाची नोंद आहे. म्हणजे 1996 मध्ये भारतात शेतक–यांच्या आत्मघातकी मृत्यूचे प्रमाण दर 12.3, 2000 मध्ये 17.5, 2004 साली 19.2 एवढी उच्चांकी वाढ झाली. काही राज्यांमध्ये हा दर अधिक होता. तामिळनाडूमध्ये 32, आंध्रप्रदेशमध्ये 33.2, आणि महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाड्यातील शेतकरी सरासरीपेक्षा अधिक प्रमाणात आत्महत्या करत आहेत.

आजपर्यंत देशात सात लाखापेक्षा अधिक शेत–यांनी आत्महत्या केल्या आहेत. दरवर्षी सरासरी 14 ते 15 हजार शेतकरी आत्महत्या करतात. म्हणजे दिवसाला या देशात 40 आत्महत्या होतात, असे नॅशनल सॅम्पर स्वर्हे ऑर्गनायझेशनद्वारे सरकारने प्रसिद्ध केलेल्या या आकडेवारीवर जरी विश्वास ठेवला तरी दर तासाला दोन शेतकरी आत्महत्या करतात. हे सिद्ध होते. 2015 च्या मागील सहा महिन्यांत महाराष्ट्रात 1300 शेतक–यांनी आत्महत्या केल्याचे धक्कादायक वास्तव राज्य महसूल विभागद्वारा पूढे आले आहे. देशपातळीवर महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्याबाबत एक नंबरला आहे. पुरोगामी महाराष्ट्राला ही बाब शोभनीय नाही. शेतक–यांच्या आत्महत्या ही एक राष्ट्रीय आपत्ती आहे, तरी देशातील शासन आणि प्रशासन गंभीरपणे या समस्याकडे पाहतांना दिसत नाहीत. प्रचार आणि प्रसारमाध्यमे पाहिजे त्याप्रमाणात प्रबोधन करत नाहीत किंवा चर्चा घडवून आणत नाहीत. व्यवस्थेमध्ये गांभीर्य निर्माण करत नाही. एकूण शेती आणि शेत–यांच्या प्रश्नाकडे शासन आणि प्रशासनाची बेफिकीरवृत्ती आणि उदासीन मानसिकता तपासणे आवश्यक झाले आहे. तसेच शेतक–यांच्या नैराश्य आणि वैफल्येग्रस्ततेचे मुळ कारणे शोधनेही

Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

काळाची गरज आहे. त्यातूनच आपण जगाच्या पोशिंदा बळीराजा वाचवू शकतो. प्रस्तुत शोध निबंधात या सर्व बाबींची चर्चा केली आहे.

अभ्यासाचे उद्देश :

1. शेतक–यांच्या आत्महत्यांची कारणे शोधणे.
2. नव आर्थिक धोरण आणि शेतक–यांच्या आत्महत्या याचा सहसंदर्भ अभ्यास करणे.
3. शेतक–यांच्या आत्महत्या कमी करण्यासाठी उपाययोजना सूचविणे.

अभ्यासाची गृहितके :

1. शासन आणि प्रशासनाची उदासिनता, पर्यावरणाचा –हास, वाढती लोकसंख्या, वाढता भौतिकवाद आणि दुष्काळ आदी. कारणे शेतक–यांच्या आत्महत्याला कारणीभूत आहेत.
2. नव आर्थिक धोरण हे शेतक–यांच्या आत्महत्याचे प्रमुख कारण आहे.
3. लोकाभिमुख कल्याणकारी योजना राबविण्यासाठी आणि प्रशासनाची मानसिकता सकारात्मक असणे आवश्यक आहे.

संशोधन पद्धती :

भारतीय शेत–यांच्या आत्महत्या : कारणे व उपाययोजना ' या शोधनिबंधाच्या मांडणीसाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे आणि प्रस्तुत शोधनिबंधाचे लेखन केले आहे.

भारतीय शेतक–यांच्या आत्महत्या कारणे :

1. नव आर्थिक धोरणांमुळे शेतक–यांना मिळणा–या सबसिडीतील झालेली घट
2. जैव तंत्रज्ञानाधारीत बी बियाणे विकणा–या बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी
3. परदेशातून होणारी अन्नधान्याची आयात खुल व शिथील करण्याचा निर्णय
4. शेतीमालाल बाजारभाव न मिळणे
5. खाजगी सावकारी, कर्जबाजारीपणा आणि कर्ज वेळेवर न मिळणे
6. शेतक–यांची व्यसनाधीनता
7. वाढत्या भौतीक गरजा
8. सिंचनाची आणि सिंचनाच्या व्यवस्थापनाची कमतरता
9. व्यवहारीक ज्ञानाचा अभाव
10. आळस, अज्ञान आणि दैववाद
11. शिक्षणाची कमतरता
12. खोटी प्रतिष्ठा
13. दुष्काळ किंवा अपुरे पर्जन्यमान, गारपीट आणि अवर्षण
14. वाढते मजुरीचे दर आणि मजुरांची कमतरता
15. व्यापारी दलालांचे शोषण
16. लघु आणि जोडउद्योगांची कमतरता

Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

17. वाढता खर्च आणि कमी उत्पन्न
18. कृषि क्षेत्रावरील वाढते अवलंबित्व
19. बिगर कृषि क्षेत्रातील रोजगार संधीचा अभाव
20. ग्रामीण भागातील अपु–या सुविधा
21. दर्जेदार बि बियाणे, खते व अवजारे यांची कमतरता
22. अल्पभुधारक शेतक–यांच वाढते प्रमाण
23. विजेचा तुटवडा
24. वाढती महागाई
25. एकटेपणा / वाढता व्यक्तीवाद
26. कौटुंबिक जबाबदा–या
27. अतिरिक्त अपत्यांमुळे
28. शासन आणि प्रशासनातील उदासिनता
29. शासन आणि प्रशासनातील उदासिनता
30. मक्तेदारी किंवा पेटंट संस्कृती
31. अंधश्रद्धा
32. प्रक्रीया उद्योगांची कमतरता
33. शासकीय ध्येय–धोरणातील उदासिनता

भारतीय शेतक–यांच्या आत्महत्या : उपाययोजना :

1. शेतक–यांच्या आत्महत्या राष्ट्रीय आपत्ती आहे. हे शासनाचे घोषीत करून उपाययोजन आखाव्यात.
2. शेतक–यांना सबसिडी वाढ करावी.
3. स्मार्ट शेतीची संकल्पना राबवावी.
4. सिंचनाच्या सोयी–सुविधा वाढवाव्यात.
5. जलयुक्त शिवाराची व्याप्ती वाढवावी.
6. पुनर्भरण मोहीम राबविण्यासाठी शासन आणि प्रशासन कठोर भूमिका घ्यावी.
7. अभ्यासक्रमात जलसाक्षरतेचा समावेश करावा.
8. शेती पुरक व्यवसाय उभे करावेत.
9. शासनाकडून शेतक–यांना 'जीवन विमा ' आणि 'पिक विमा योजना ' लागू करावा.

Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

10. 'गाव तिथं परिक्षण केंद्र ' उभे करावेत.

11. बहुराष्ट्रीय कंपन्यांवर निर्बंध आणावेत.

12. शेतकरी कुटूंबानी 'हम दो हमारा एक' हा नारा अंगीकारावा.

13. भौतिक गरजा कमी कराव्यात.

14. बचतीची सवय लावावी.

15. जोड आणि लघुउद्योग करावेत.

16. उत्पन्न आणि खर्चाचे नियोजन करावे.

17. उत्पन्न आणि खर्चाचे नियोजन करावे.

18. अन्नधान्य वितरण व्यवस्था अधिक सक्षक करावी.

19. उत्पादकता वाढविण्यासाठी अंतरपिकांची माहीती द्यावी.

20. शेतमालाल योग्य भाव मिळावा.

21. बिगरशेती क्षेत्रातील रोजगार संधी उपलब्ध करून द्याव्यात.

22. शेतक–यांनी व्यवसनमुक्त व्हावे.

23. सेवाभावी संस्था व ट्रस्ट यांनी शेतीविकासासाठी गावे दत्तक घ्यावीत.

24. कृषि विकास कर सुरू करावा

25. भ्रष्टाचार मुक्त भारत करावा.

26. शासन आणि प्रशासन अधिक लोकभिमुख आणि लोककल्याणकारी व्हावे.

27. ग्रामीण भागात रोजगार, सेवा, उद्योग आणि नोक–यांचे विकेंद्रिकीकरण होणे आवश्यक आहे.

28. शेतक–यांच्या मुलांना सर्व शिक्षण मोफत व्हावे.

29. योग्य वेळी कृत्रिम पावसाचे प्रयोग करावेत.

30. शिक्षण आणि आरोग्याचे राष्ट्रीयकरण करणे आवश्यक आहे.

31. अडते / मध्यस्थ / दलाल मुक्त बाजारपेठ निर्माण करणे.

32. शेतीसाठी विशेष 'आर्थिक क्षेत्र' तयार करावे.

33. शेतीला व्यवसायाचा दर्जा देण्यात यावा.

Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.

संदर्भ :

1. दै. लोकसत्ता
2. दै. लोकमत
3. दै. महाराष्ट्र टाईम्स
4. दै. सकाळ
5. दै. सामना
6. लोकराज्य
7. डॉ. गव्हाणे एस. जे – शेतक–यांच्या आत्महत्या
8. ढोबळे विष्णू – शेतक–यांच्या आत्महत्या जागतिकीकरणातील शोकांतिका

Dr. Pramod Ambadasrao Pawar, Editor-in-Chief ©EJ, All rights reserved.